# अखिल भारतीय समन्वयीत कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

जा.क्र.को.शे.सं.प्र./कंत्राटी/ ८२ /२०२३ दिनांक: ३०/०६/२०२३

## निविदा सुचना

विषय:- सन **२०२३-२४** मध्ये अखिल भारतीय समन्वयीत कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प, डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला अंतर्गत प्रक्षेत्रावरील करावयाचे कामे उदा, विविध संशोधनात्मक प्रयोगांचे व्यवस्थापन, शेती व इतर कामे कंत्राट पध्दतीने प्रती हेक्टरी/प्रती दिन/प्रती नग करण्याकरिता वैध परवानधारक कंत्राटदाराकडून मजूरांचे (स्त्री/पुरुष) निविदा दर (कोटेशन) बोलविण्याबाबत...

संदर्भ:- जा.क्र. संसं/शा.अ./कं.द./४०३/२०२२ दिनांक: ०८/०६/२०२२

वरील संदर्भांकित विषयाच्या अनुसरून आपणास कळविण्यात येते की, अखिल भारतीय कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प डॉ. पंदेकृवि, अकोला अंतर्गत प्रक्षेत्रावरील करावयाचे कामे उदा, विविध संशोधनात्मक प्रयोगांचे व्यवस्थापन, शेती व इतर कामे कंत्राट पध्दतीने करण्यासाठी प्रती हेक्टरी/प्रती दिन/प्रती नग करण्याकरिता वैध परवानधारक कंत्राटदाराकडून मजूरांचे (स्त्री/पुरुष) निविदा दर खालील प्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून मागविण्यात येत असून निविदा मसुदा/निविदेचे स्वरुप सोबत जोडण्यात आलेले आहे.

सोबत जोडलेल्या प्रपत्रात तपशीलप्रमाणे दिनांक १४.०७.२०२३ पर्यंत कार्यालयीन वेळेत सीलबंद लिफाफ्यामध्ये संबंधित दस्तावेजासह खालील दिलेल्या अटी व शर्तीस अनुसरून सादर करावे.

अटी व शर्ती

१. निविदा पत्रक/कोटेशन कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी ५.३० या वेळेत स्वीकारल्या जातील.
२. निविदा/कोटेशन प्रमुख शास्त्रज्ञ, अखिल भारतीय कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प डॉ. पंदेकृवि, अकोला यांचे नावे सीलबंद लिफाफामध्ये पाठवावी.
३. कंत्राटदाराकडे संबंधित कामाचा वैध परवाना असणे बंधनकारक आहे. कंत्राटदाराला परवाना व संबंधित इतर सर्व आवश्यक कागदपत्रे या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.
४. निविदा/कोटेशन मधील संबंधित शेती कामे व इतर कामे कंत्राट पध्दतीने करण्याचे दर नियमाप्रमाणे सर्व करासह नमूद करण्यात यावे तसेच त्या कराचा विहित मुदतीमध्ये भरणा करण्यासाठी वापरण्यात येणा-या स्त्री/पुरुष मजुरांचे व्यवस्थापनाची संपूर्ण जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील.
५. अखिल भारतीय कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प डॉ. पंदेकृवि, अकोला अंतर्गत प्रक्षेत्रावरील शेती व इतर कामे करीत असतांना यंत्राचे/वाहनाचे/नवीन सुट्या भागांचे ई. नुकसान झाल्यास विद्यापीठ प्रशासनाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे नुकसान भरपाई संबंधित कंत्राटदाराकडून वसूल करण्यात येईल.
६. अखिल भारतीय कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प डॉ. पंदेकृवि, अकोला अंतर्गत प्रक्षेत्रावरील शेती व इतर कामे करीत असतांना कुठलीही दुर्घटना/अपघात/जीवितहानी झाल्यास हे कार्यालय किंवा कोणताही कर्मचारी/अधिकारी किंवा विद्यापीठ जबाबदार राहणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील.
७. कंत्राटदाराने पुरवठा केलेल्या मजुराने अनुचित प्रकार केल्यास त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. सदर कंत्राटी मजुरांची जबाबदारी पुरवठादाराची राहील.
८. काही विपरीत घटना तथा विपरीत बाबी / प्रसंगी कंत्राट आपोआप संपुष्टात येईल.
९. पुरवठादाराचे मजुर पूर्णतः कंत्राटी पद्धतीने असतील त्यात विदयापीठ प्रशासनाचा कोणताही संबंध कामावर ठेवण्याबाबत राहणार नाही, मजुरांची कुठल्याही प्रकारची कामावर असल्याची जेष्ठता यादी विभागामार्फत देण्यात येणार नाही.
१०. कंत्राटदारास कामाच्या आवश्यकतेनुसार मजुर उपलब्ध करुन न दिल्यास करार रद्द करण्यात येऊन सदर कंत्राटदारास या पुढील निविदा प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.
११. अखिल भारतीय कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प डॉ. पंदेकृवि, अकोला अंतर्गत प्रक्षेत्रावरील देण्यात आलेली शेती व इतर कामे वेळेत पूर्ण करण्यात यावी, कामाबाबत विभागाकडून तक्रार आल्यास किंवा काम अर्धवट राहिल्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही.
१२. विद्यापीठ प्रशासनाने वेळोवेळी निर्देशित केलेल्या नियमांचे पालन करणे संबंधित कंत्राटदारांना बंधनकारक राहील.
१३. कंत्राटदारांनी देयक सादर करतेवेळी बँक खाते बाबतची संपूर्ण माहिती सादर करावी, अन्यथा देयक अदा केले जाणार नाही.

१४. अखिल भारतीय कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प डॉ. पंदेकृवि, अकोला अंतर्गत प्रक्षेत्रावरील शेती व इतर कामाकरिता पुरविण्यात आलेल्या कंत्राटी कामगाराचे देयक काम पूर्ण व विहित वेळेत पूर्ण केल्यावर तसेच संबंधित विभागाचे प्रभारी अधिकारी यांना काम समाधानकारक झाल्याचे प्रमाणित केल्यानंतरच कंत्राटी कामगाराचे देयक पारित करण्यात येईल.

१५. अखिल भारतीय कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प डॉ. पंदेकृवि, अकोला अंतर्गत प्रक्षेत्रावरील शेती व इतर कामे करण्यासाठी वापरण्यात येणा-या स्त्री/पुरुष तांत्रिक कामगारांना, कामगार(Labour Act) कायद्यानुसार किमान वेतन, विमा संरक्षण, भविष्य निर्वाह निधी देणे, कॅशलेस पध्दतीचा अवलंब करणे इत्यादीची संपूर्ण जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील.

१६. अखिल भारतीय कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प डॉ. पंदेकृवि, अकोला अंतर्गत प्रक्षेत्रावरील शेती व इतर कामे करीत असतांना कोणताही वाद विवाद निर्माण झाल्यास सदर वाद विवाद विद्यापीठ विधी विभागाचे अधिकारी, विभाग प्रमुख कृषि शक्ती व औजारे, मा. संशोधन संचालक, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचे समक्ष मिटविला जाईल व अंतिम निर्णय मा. संशोधन संचालक, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचा राहील आणि तो सर्वांना मान्य करणे बंधनकारक राहील.

१७. अखिल भारतीय कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प डॉ. पंदेकृवि, अकोला अंतर्गत प्रक्षेत्रावरील शेती व इतर कामे हि एक वर्षामधील खरीप, रब्बी व उन्हाळी या तिन्ही हंगामाकरिता असून कंत्राटी कामगाराचे दर एक वर्षाकरिता वैध राहतील.

१८. अखिल भारतीय कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प डॉ. पंदेकृवि, अकोला अंतर्गत प्रक्षेत्रावरील शेती व इतर कामे करण्यासाठी पुरविण्यात आलेले कंत्राटी कर्मचारी हे १८ वर्षाच्या वर असावे तसेच ६० वर्षापेक्षा कमी असावे व त्यास कोणत्याही प्रकारचे अपंगत्व नसून ते शारीरिकदृष्ट्या सक्षम असावेत.

१९. कंटात्रदारास देय रक्कमेच्या १० टक्के रक्कम अमानत रक्कम म्हणून प्रभारी अधिकारी यांचेकडे जमा करावी लागेल.

२०. कोणतीही निविदा पूर्णपणे किंवा अंशतः स्वीकारणे अथवा नाकारण्याचे अधिकार प्रमुख शास्त्रज्ञ, कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प, डॉ. पंदेकृवि., अकोला यांचेकडे राखून ठेवलेले आहेत.

२१. निविदा प्रक्रिया राबवितांना तांत्रिक अथवा प्रशासकीय अडचण आल्यास निविदा प्रक्रिया कोणत्याही स्तरावर थांबविण्याचे अथवा रद्द करण्याचे अधिकार प्रमुख शास्त्रज्ञ, कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प, डॉ. पंदेकृवि., अकोला यांचेकडे राखून ठेवलेले आहेत.

प्रमुख शास्त्रज्ञ<br>
अखिल भारतीय समन्वयीत कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प<br>
डॉ. पंदेकृवि, अकोला

## निविदा (कोटेशन) मसुदा

अखिल भारतीय समन्वयीत कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प, डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला अंतर्गत प्रक्षेत्रावरील विविध संशोधनात्मक प्रयोगांचे व्यवस्थापन, शेती व इतर कामे कंत्राट पध्दतीने प्रती हेक्टरी/प्रती दिन/प्रती नग करण्याकरिता कुशल/अकुशल मजूरांचे (स्त्री/पुरूष) दर खालील प्रमाणे देण्यात यावे.

| अ.क्र. | कामाचा तपशील | मनुष्यबळ | दर (प्रति व्यक्ती) |
|---|---|---|---|
| १ | शेतीविषयक कामे : निंदण करणे, तन काढणे, पेरणी आणि पुनर्लागवड करणे, खत देणे, फवारणी करणे, डवरणी करणे, पिकाची कापणी व काढणी करणे व इतर शेती व प्रक्षेत्र विषयक कामे | प्रति व्यक्ती (पुरुष /स्त्री ) | |
| २ | प्रक्षेत्र व पीक संरक्षण करीता चौकीदार | प्रति व्यक्ती (पुरुष ) | |
| ३ | कार्यालयीन व इतर कामाकरिता कामगार | प्रति व्यक्ती (पुरुष ) | |

**निविदा सूचनेमधील संपूर्ण अटी व शर्ती सर्वस्वी मान्य आहेत.**

ठिकाण:

दिनांक: